# ८. नाट्य

## महाराष्ट्रातील नाट्यसंगीत (स्वातंत्र्योत्तर कालखंड)

विद्यार्थी मित्रांनो इयत्ता अकरावीच्या पाठ्यक्रमात आपण महाराष्ट्रातील नाट्यसंगीताचा स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील इतिहास पाहिला. विष्णुदास भावे यांनी १८४३ साली मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली आणि पाहता पाहता मराठी नाटकाला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने जुन्या लोकप्रिय संगीतनाटकांचे पुन्हा सादरीकरण करण्यात आले. नव्याने मराठी रसिकांच्या मनात मराठी नाटकांविषयी आकर्षण निर्माण झाले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात संगीतनाटकाचा विकास कसा होत गेला हे खालील मुद्द्यांच्या आधारे पाहता येईल.

१) **शिलेदार कुटुंबीयांचे योगदान :** मराठी रंगभूमीसाठी शिलेदार कुटुंबीयांनी मोलाचे योगदान दिले आहे. जयराम शिलेदार आणि जयमाला शिलेदार यांनी 'मराठी रंगभूमी' ही संस्था १९४९ मध्ये स्थापना केली. या संस्थेने अनेक जुनी संगीत नाटके नवीन संचात पुन्हा सादर केली. उदा. सौभद्र, संशयकल्लोळ, शारदा, शाकुंतल, मानापमान इत्यादी. विद्याधर गोखले यांनी 'स्वरसम्राज्ञी' हे नाटक रंगभूमीवर आणले. याशिवाय शिलेदार कंपनीने एखाद्याचे नशीब, मुंबईची माणसे, अभोगी ही नवीन नाटके सादर केली.

**हे जाणून घ्या**

व्यवसायिक दृष्ट्या विद्याधर गोखले यांची कामगिरी विशेष श्रेयस्कर ठरते. सुवर्णतुला या नाटकाचे त्यांनी सौभद्रच्या धर्तीने, भरगच्च संगीतप्रधान आणि शृंगार विनोदाच्या मिश्रणाने रोचक झालेले नाटक पुनरुज्जीवित केले. श्रीकृष्ण, बलराम, रुक्मिणी, सत्यभामा, नारद यांच्यासारखी परिचित पात्रे नव्या संदर्भात प्रेक्षकांसमोर आणली. छोटा गंधर्व, जयमाला शिलेदार, राम मराठे इत्यादी मराठी संगीत नाटकातील पारंपरिक पठडीतील कलावंत मंडळींनीदेखील संगीत रंगभूमीला दिलासा दिला.

२) **पु.ल. देशपांडे यांचे योगदान :** महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेल्या पु. ल.देशपांडे यांनी सुद्धा संगीत नाटक विकसित करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. मराठी संगीत नाटकांसाठी त्यांनी पुष्कळ लिखाण केले. 'सुंदर मी होणार' या नाटकात त्यांनी एक संगीत पात्र घालून संगीत नाटकाच्या धर्तीवर संगीत दिले. पु.ल. केवळ लेखन करून थांबले नाहीत तर त्यांनी 'वाऱ्यावरची वरात' या नाटकात उत्कृष्ट हार्मोनियम वादन केले. 'तीन पैशांचा तमाशा' व 'ती फुलराणी' यांसारख्या नाटकात वातावरण निर्मितीसाठी त्यांनी विविध वाद्यांचा प्रयोग केला.

३) **पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे योगदान :** पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी 'दि गोवा हिंदू असोसिएशन' ही नाटक संस्था स्थापना केली. वसंत कानेटकर यांच्या 'मत्स्यगंधा' आणि वि. वा.शिरवाडकर यांच्या 'ययाती – देवयानी' या नाटकांना त्यांनी संगीत दिले. त्यामुळे रामदास कामत व आशालता वाबगावकर यांच्यासारखे कलावंत रंगभूमीला मिळाले. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाचे संगीत दिग्दर्शन पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी केले. वसंतरावांनी केलेली खाँसाहेबांची भूमिका आणि अभिषेकी यांचे संगीत यामुळे यातील नाट्यगीते अजरामर झाली. त्यानंतर रणजित देसाई यांचे ' हे बंध रेशमाचे', वसंत कानेटकरांचे 'मीरा मधुरा', 'मत्स्यगंधा' व 'लेकुरे उदंड जाहली' आणि वसू भगत यांचे 'वासवदत्ता' अशा अनेक नाटकांना पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत देऊन यातील नाट्यपदांना लोकप्रिय केले.

**हे जाणून घ्या**

कट्यार काळजात घुसली याची कथा दोन मातब्बर गवयांच्या स्पर्धेवर आधारित असल्याने याचे वातावरण खानदानी संगीताने धुंद होते. कै. वसंतराव देशपांडे यांनी खाँ साहेबांची भूमिका अजरामर केली आहे.

४) **स्त्री कलावंतांचे आगमन :** त्या काळी स्त्रियांनी संगीत शिकणे किंवा नाटकात काम करणे हे प्रतिष्ठेचे समजले जात नसे. त्यामुळे बालगंधर्व आणि केशवराव भोसले यांच्यासारखे पुरुष कलावंत रंगमंचावर आले. त्यांनी अनेक स्त्री भूमिका आपल्या सुमधुर आवाजाने व सक्षम अभिनयाने यशस्वीपणे साकारल्या. काळ बदलला आणि हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे, ज्योत्स्ना भोळे यासारख्या गायिकांनी परंपरा, अनिष्ट नीतिनियमांचे पाश झुगारून देत रंगमंचावर पदार्पण केले. त्यानंतर मात्र अनेक स्त्री कलाकार रंगमंचाकडे आकर्षित झाल्या. बकुळ पंडित, क्षमा वैद्य, मीनाक्षी कान्होपात्रा, आशा खाडीलकर, निलाक्षी जुवेकर, फैयाज, रजनी जोशी, मधुवंती दांडेकर या व अशा अनेक गायिका रंगमंचाची सेवा करू लागल्या.

५) **अभिनव प्रयोग :** मराठी रंगभूमीच्या इतिहासाच्या या टप्प्यात अनेक अभिनव प्रयोग करण्यात आले. संगीत नाटकात अनेक पात्रे रंगमंचावर येऊन नाटक सादर करीत असतात परंतु सुहासिनी मुळगावकर यांनी 'सौभद्र' हे नाटक एकपात्री अभिनयातून १९६० साली दिल्ली येथे सादर केले.या अभिनव प्रयोगाचे खूप कौतुक झाले. सुहासिनी मुळगावकर यांचा आदर्श घेऊन पुढे माया मल्लापूर आणि पद्‌माकर देव यांनी 'संगीत स्वयंवर' हे नाटक दोन पात्रांच्या माध्यमातून साकार केले. शिलेदार परिवाराने 'सौभद्र' व 'स्वयंवर' या नाटकाचा त्रिपात्री प्रयोग करून वाहवा मिळवली.

६) **लोकसंगीत व नाट्यसंगीत :** १९५७ नंतरच्या नाट्यसंगीतात अनेकविध गीतप्रकारांचा आणि गीतसादरीकरणाच्या नवीन पद्‌धतींचा समावेश झाला. त्यात लावणी, रागदारी, ख्याल, ठुमरी, टप्पा, तराणा, गझल, कजरी, अभंग, भजन, भावगीत, अभिनय गीत, द्वंद्व गीत, जुगलबंदी, शेर शायरी इत्यादी अनेकविध गीतप्रकारांच्या आणि ती सादर करण्याच्या अनेक पद्‌धतींचा अंतर्भाव दिसून आला. विजय तेंडुलकर यांच्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकाला लोकसंगीताचा बाज असलेले संगीत देण्यात आले. रत्नाकर मतकरी यांच्या 'लोककथा ७८' या नाटकाला लोकसंगीतावर आधारित संगीत देण्यात आले.

७) **नाट्यसंगीताचे प्रात्यक्षिक :** मराठी नाट्यसंगीताचा विकास होत असताना यात अनेक प्रयोग करण्यात आले. यामध्ये नाट्यसंगीताचा प्रसार करण्यासाठी अनेक कलावंतांनी प्रात्यक्षिकांचे प्रयोग केले. नाट्यसंगीताच्या प्रात्यक्षिकांचा पहिला प्रयोग केला तो नानासाहेब जोग यांनी. यानंतर पुढे पु. ल. देशपांडे–रामभाऊ गुळवणी आणि वामनराव सडोलीकर–ह. रा. महाजनी या जोड्यांनी असे प्रयोग केले. छोटा गंधर्व आणि वसंतराव देशपांडे ही जोडी शास्त्रीय संगीतातील मूळ बंदिशी आणि त्यांचे नाट्यगीतात रूपांतर अशा सादरीकरणातून नाट्यसंगीताच्या विकासाच्या टप्प्यांचे विवेचन करत असे. पंडित हृदयनाथ मंगेशकर व चारूदत्त आफळे हे कलावंतही अशा प्रकारचे प्रयोग करीत असत.

८) **मैफलीतून नाट्यसंगीत :** नाट्यसंगीत हे शास्त्रीय संगीताचे अपत्य आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. पूर्वीच्या काळी संगीत नाटकांतील अनेक नाट्यगीते ही शास्त्रीय संगीताची हुबेहूब नक्कल असायची. त्यामुळे नाट्यसंगीताचा एक वेगळा श्रोता वर्ग निर्माण झाला. शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत अनेक वेळा नाट्यसंगीतांची फर्माईश केली जायची. पुढेपुढे तर त्यांच्या केवळ नाट्यगीतांच्या मैफिली होऊ लागल्या. त्यात जुन्या पिढीतील इंदिराबाई खाडिलकर यांचे नाव घ्यावे लागेल. त्यानंतर कुमार गंधर्व, माणिक वर्मा व सध्या कीर्ती शिलेदार, प्रभाकर कारेकर, अजित कडकडे, अरविंद पिळगावकर, प्रसाद सावकार इत्यादी गायकांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. तसेच अहमदजान थिरकवाँ, विनायक थोरात, केशवराव नावेलकर, साई बँकर, हरीभाऊ देशपांडे, मधुकर खाडीलकर, राजीव परांजपे इत्यादी वादक साथीदाराचाही उल्लेख करावा लागेल.

**रंगभूमीचे आधूनिक स्वरूप :**

१९४३ साली सुरू झालेल्या मराठी रंगभूमीवर अनेक बदल घडत गेले. अनेक प्रयोग होत गेले. पूर्वी मनोरंजनाची

साधने नसल्यामुळे संगीत नाटके रात्रभर चालायची. त्यानंतर मूकपट व बोलपटांचा जमाना आला आणि संगीत रंगभूमीवर त्याचा परिणाम झाला. मनोरंजनाची साधने वाढली. धावत्या युगात व्यक्तींना वेळ मिळेनासा झाला. त्यामुळे पाच अंकी संगीत नाटकांऐवजी तीन अंकी, दोन अंकी व एकांकिकेसारखे नाट्यप्रकार उदयास आले. एकपात्री, मुकाभिनय, प्रहसन, स्वरनाटिका व कठपुतलीच्या धर्तीवर नाटके सादर करण्यात येत आहेत. या संगीत नाटकात भलेही अनेक स्थित्यंतरे घडून आली असली तरी रंगभूमी संगीताशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

**हे जाणून घ्या**

बोलपटांच्या आगमनानंतर काही वर्षांतच मराठी रंगभूमीच्या विपन्नावस्थेला सुरुवात झाली. मात्र आचार्य अत्र्यांच्या ऐतिहासिक नाटकांनी काही काळ मराठी नाट्यव्यवसायात तजेला निर्माण केला. मो. ग. रांगणेकरांची नाट्यनिकेतन ही एकच संस्था बरेच दिवस तग धरून होती.

## स्वाध्याय

प्र. १ स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मराठी संगीत रंगभूमीसाठी कोणकोणत्या कलाकारांनी योगदान दिले?

प्र. २ आधुनिक मराठी रंगभूमीवर संगीताचे कोणकोणते प्रयोग केले गेले?

**उपक्रम :**

**(१) मराठी नाट्यसंगीताच्या सुवर्णकाळातील संगीत नाटके व स्वातंत्र्योत्तर नाटकांतील नाट्यपदे ऐकून त्यातील बदल अनुभवा.**

**(२) नाट्यसंगीताच्या मैफिली ऐका.**

**(३) फक्त नावे लिहा.**

(i) संगीत नाटकातील वादक साथीदार

(ii) संगीत रंगभूमीवरील पुरुष कलाकार

(iii) पं. जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत दिलेली नाटके

**भरतनाटयम्**





